रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय नवी मुंबई
आवक क्र. 9083
दिनांक 21 NOV 2011

C-69

राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजाणी करीता संबंधित विभागाच्या समन्वय अधिकारी (Nodal Officer) यांच्या गोपनीय अहवालात नोद घेण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र.कौविका-२०११/(१७३/२०११)/व्यशि-५
दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०११.

पहा :
१. शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(३/२०१०)/व्यशि-५, दिनांक १९ मे, २०१०.
२. शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(१४२/२०१०)/व्यशि-५, दिनांक ९ मे, २०११.
३. मा.मुख्य सचिव यांचे अ. शा. पत्र क्र.कौविका-२०११/(१५५/११)/व्यशि-५ दिनांक १० ऑगस्ट २०११.
४. मा.आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांचे अ. शा. पत्र क्र.१/व्यशि/२०११/०७, दिनांक ०९/०९/२०११.

## शासन परिपत्रक

मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकासासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची (Prime Minister's National Council on Skill Development) स्थापना करण्यांत आली आहे. सदरहू कौशल्य विकास परिषदेने ५०० दशलक्ष कुशल मनुष्यबळाची निर्मिती सन २०२२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

त्याअनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन निर्णयानुसार राज्य कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली "राज्य कौशल्य विकास शिखर परिषद" आणि मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "राज्य कौशल्य विकास कार्यकारी समितीची" स्थापना करण्यांत आली आहे. तसेच राज्राज्यस्तरावर ४.५ कोटी एवढे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याचे वार्षिक उद्दिष्ट ठरविण्यांत आलेले आहे.

कौशल्य विकास कार्यक्रमाची राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी व या कार्यक्रमाला गतिमानता यावी, तसेच उद्दिष्टपूर्ती व्हावी म्हणून संबंधित विभागाच्या Nodal Officer (समन्वय अधिकारी) यांनी त्या विभागाशी संबंधित कौशल्य विकासाच्यादृष्टीने केलेल्या कामाचे मुल्यमापन आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास हे करुन त्यानुसार संबंधित विभागाच्या

सचिवांना कळविणार आहेत. त्याआधारे विभागाचे सचिव संबंधित समन्वय अधिकारी (Nodal Officer) यांचे गोपनीय अहवाल लिहिताना या बाबीचा विचार करुन गोपनीय अहवाल लिहितील.

हे शासन परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय सांकेतांक क्र. २०१११११०३१६३७२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(गौ.जो.रसाळ)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा.मुख्य सचिव कार्यालय यांचे स्वीय सहाय्यक.
सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
निवड नस्ती/व्यशि-५